मुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
नवी मुंबई – ४००६१४.

दिनांक :-16 JUN 2003

30314

कार्यालयीन आदेश क्र ३९.

विषय :- जिल्हा परीषद वार्षिक लेखे शासनास सादर होण्यास होणाऱ्या विलंबाबाबत.

संदर्भ :- नाशिक येथील राज्यस्तरीय विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांच्या बैठकीचे इतिवृत्त क्र स्था. १८/ब/ सभा/एएसए/ ७७४ दिनांक ५ मे २००३.

दिनांक ८ व ९ एप्रिल २००३ रोजी नाशिक येथे आयोजित केलेल्या स्थानिक निधी लेखा विभागाच्या विभागीय उप मुख्य लेखा परीक्षक यांच्या बैठकीत उपरोक्त संदर्भाधिन विषयावर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने खालिल आदेश देण्यात येत आहेत.

१] उपमुख्य लेखा परीक्षक [वरिष्ठ] नागपूर यांनी भंडारा व गोंदिया जिल्हयाचे सन ९९–२००० चे वार्षिक लेखे तात्काळ शासनास सादर होतील या दृष्टीने प्रयत्न करावेत.

२] सन २०००–२००१ चे ज्या ज्या जिल्हयाचे वार्षिक लेखे पूलंबित आहेत त्या त्या जिल्हास्तरीय उप मुख्य लेखा परीक्षक आणि संबधीत विभागीय उप मुख्य लेखा परीक्षक यांनी हे वार्षिक लेखे शासनास तात्काळ सादर होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

३] वार्षिक लेखे शासनास तात्काळ सादर व्हावेत यासाठी जिल्हास्तरीय उपमुख्य लेखा परीक्षक व वार्षिक लेखे तपासणीसाठी विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांचेकडे प्राप्त झाल्यावर ते त्यांनी स्वत:कडे जास्त पूलंबित ठेवू नयेत.

26/5/03

मुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य
नवी मुंबई.

प्रत :-
१] उपमुख्य लेखा परीक्षक [वरिष्ठ] स्थानिक निधी लेखा विभाग [सर्व]
२] उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा जिल्हा [सर्व]
३] उपमुख्य लेखा परीक्षक, [प. स. स.] स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
४] अधिक्षक [अहवाल/~~प्रशास~~]
५] सहा अधिक्षक अहवाल.
६] अभिलेखापाल.